अनधिकृत गैरहजर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत रुजू करुन घेण्याबाबत- डॉ.दत्ता गुंडाजी नारायणकर, वैद्यकीय अधिकारी गट-अ.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः मवैअ २०१३/१७३२/प्र.क्र. ६५२/सेवा-३
१० वा मजला, संकुल इमारत, गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : १८ जानेवारी, २०१६.

वाचा : १) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/२ब/टे-४/अ.गै./२ब १३१४/१५, दिनांक १३.८.२०१५.

प्रस्तावना :-

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे रुपये ५४००) या संवर्गातील अनधिकृतरित्या गैरहजर असलेले वैद्यकीय अधिकारी गट-अ यांना शासन सेवेत इच्छुक असल्यास सेवेत रुजू करुन घेण्याच्या अनुषंगाने डॉ.दत्ता गुंडाजी नारायणकर, वैद्यकीय अधिकारी गट-अ यांना शासन सेवेत रुजू करुन घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु.१५६०० -३९१०० + ग्रेड पे रु.५४००/-) या संवर्गातील डॉ.दत्ता गुंडाजी नारायणकर, वैद्यकीय अधिकारी गट-अ हे अनधिकृरित्या गैरहजर असल्यामुळे त्यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन सेवेत रुजू करुन घेण्यात येत आहे :-

अटी व शर्ती :-

१) वैद्यकीय मंडळामार्फत तपासणी करण्यात यावी.

२) चारित्र्य व वर्तणूक अहवाल (पोलीस तपास अहवाल) द्यावा.

३) सेवेत रुजू झाल्यानंतर किमान ५ वर्षे शासन सेवा करतील व राजीनामा अथवा स्वेच्छा सेवानिवृत्ती घेणार नाहीत अशा आशयाचे बंधपत्र लिहून द्यावे.

४) अनधिकृत गैरहजर असल्यामुळे त्यांना दिनांक २.८.२००२ पासून प्रत्यक्ष रुजू होईपर्यंतच्या कालावधीचे वेतन अनुज्ञेय होणार नाही, गैरहजर कालावधी हा विनावेतन करण्यात येईल आणि याबाबतीतील कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही. याबाबत लेखी शपथपत्र द्यावे.

५) दिनांक २.८.२००२ पासून प्रत्यक्ष सेवेत रुजू होईपर्यंतचा गैरहजेरीचा कालावधी हा “सेवाखंड” म्हणून समजण्यात येत आहे.

६) अनधिकृत गैरहजेरीबाबत नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल व त्याचा निर्णय बंधनकारक राहील.

७) अनधिकृत गैरहजर असल्यामुळे सदर अधिकाऱ्यांनी कोणत्याही न्यायालयात किंवा लोकआयुक्त यांच्याकडे दाद मागणार नसल्याबाबत बंधपत्रात सादर करावे.

डॉ.दत्ता गुंडाजी नारायणकर, वैद्यकीय अधिकारी गट-अ यांनी वरील अटी व शर्तींची पूर्तता करुन सदर शासन निर्णय प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांत संबंधित संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे हजर व्हावे. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्यांना विहीत अटी व शर्तींच्या अधिन राहून सेवेत हजर करुन घ्यावे आणि त्यांना पदस्थापनेबाबतचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११८१४५११९७२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaskar Baburao Patil

Digitally signed by Bhaskar Baburao Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhaskar Baburao Patil
Date: 2016.01.18 18:19:49 +05'30'

(भा. बा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव.

२) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर.

३) संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
४) सह संचालक (प्रशासन व अर्थसंकल्प) आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५) सर्व उप संचालक, आरोग्य सेवा मंडळे.
६) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
८) संबंधित वैद्यकीय अधिकारी. (संबंधित उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ यांच्यामार्फत)
९) निवडनस्ती (सेवा-३)